**सुधारीत चक्रानुक्रम**

**क्रमांक : १०७४८ /ई-१ कक्ष**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३ ऑगस्ट, २०२०

**प्रेषक :**

**सचिव (कार्यभार),**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याबाबत**

**संदर्भ : या सचिवालयाचे पत्र क्रमांक ८९१७/ई-१, दिनांक २४ जून, २०२०**

**महोदय/ महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक २८ जुलै, २०२० रोजी झालेल्या बैठकीत आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशन पुर्वनियोजित सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० ऐवजी सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच, सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजीच्या अधिक्रमित केलेल्या पावसाळी अधिवेशनासंदर्भात महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास प्राप्त झालेले तारांकित प्रश्न व्यपगत न करता आहे तसेच पुढे चालू ठेवण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७२ मधील तरतूदीचे अवलोकन केले असता "सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, *३० पेक्षा कमी नाहीत इतक्या पूर्ण दिवसांची तारांकित प्रश्नांसंबंधीची सूचना देण्यात येईल."

त्यानुषंगाने उपरोक्त संदर्भाधीन पत्राचे अधिक्रमण करुन तारांकित प्रश्नांबाबतचा सुधारित चक्रानुक्रम निर्गमित करण्यात येत आहे. अधिक्रमित केलेल्या पूर्वनियोजित सत्रातील तारांकित प्रश्नांवरील कार्यवाही पुढे सुरु ठेवण्यात येणार असल्याने आगामी अधिवेशनाकरीता विधानपरिषदेतील प्रचलित कार्यपध्दतीनुसार तारांकित प्रश्नावर कार्यवाही न करता म.वि.प. नियम ७२ मधील तरतूदीच्या अधिन राहून आगामी सत्राकरीता मा.सदस्यांकडून नव्याने तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्यात येवून त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

सुधारीत कार्यक्रमानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला

..२/-

सुधारीत चक्रानुक्रम पत्रक भाग दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजी ईमेलद्वारे पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजीपासून QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील. मा.सदस्यांना प्रश्न सूचना स्वीकारण्याचा प्रथम दिनांकापासून चक्रानुक्रमात नमूद केलेल्या विवक्षित उत्तराच्या दिनांकाकरीता प्रश्न सूचना स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रश्न सूचना या सचिवालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

कृपया बदललेल्या कार्यक्रमाची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**( जयवंत राणे )**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## दिनांक ३ ऑगस्ट, २०२०/श्रावण १२, १९४२ शके

**संदर्भ :- या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्र.६३, दिनांक २४ जून, २०२०**

**७४.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, मंगळवार, दिनांक २८ जुलै, २०२० रोजी विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विधानपरिषदेचे सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजीपासून सुरु होणारे आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशन आता सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे होणार असून सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० ते शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२० या कालावधीसाठी दिनांक २४ जून, २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या तारांकित प्रश्नांच्या चक्रानुक्रमानुसार या सचिवालयाकडे प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांच्या सूचना व्यपगत न होता त्या आहे तश्याच कार्यवाहीत राहतील. त्यानुसार सुधारित कार्यक्रमानुसार सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० ते शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२० या कालावधीतील तारांकित स्वीकृत प्रश्न संबंधित गटासाठी सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२० या कालावधीत उपलब्ध होणाऱ्या पुढील दिनांकास उत्तरासाठी ठेवण्यात येतील.

तसेच अधिवेशनासाठी मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याच्या अखेरचा दिनांकात विधानपरिषद नियम ७२ नुसार सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजीपासून QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील.

**पूर्वनियोजित सत्राकरीता प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांचे बॅलट यापूर्वीच मंगळवार, दिनांक १४ जुलै, २०२० रोजी काढण्यात आले असल्याकारणाने बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२० पासून स्वीकारण्यात येणाऱ्या प्रश्नांचे कोणतेही बॅलट काढण्यात येणार नाही.** तसेच बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजीपासून स्वीकारण्यात येणाऱ्या प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न पूर्वनियोजित सत्रातील तारांकित प्रश्नांनंतर, त्या प्रश्नांच्या अनुक्रमांकानुसार तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.

सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२० या कालावधीत उपलब्ध होणाऱ्या पुढील दिनांकास उत्तरासाठी ठेवण्यात येणाऱ्या प्रश्नांबाबतचा तपशील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेला आहे.

..२/-

# :: वि व र ण प त्र ::

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | उत्तराचा पुर्वीचा वार व दिनांक (३) | उत्तराचा सुधारित वार व दिनांक (४) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा वार व दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | १) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>३) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री<br>४) शालेय शिक्षण मंत्री<br>५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री<br>६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री | सोमवार, ०३ ऑगस्ट, २०२०<br>सोमवार, १० ऑगस्ट, २०२०<br>*सोमवार, १७ ऑगस्ट, २०२० | सोमवार, ०७ सप्टेंबर, २०२०<br>सोमवार, १४ सप्टेंबर, २०२०<br>*सोमवार, २१ सप्टेंबर, २०२० | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० |
| दोन | १) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>३) ऊर्जा मंत्री<br>४) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री<br>६) आदिवासी विकास मंत्री<br>७) सहकार, पणन मंत्री<br>८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | मंगळवार, ०४ ऑगस्ट, २०२०<br>मंगळवार, ११ ऑगस्ट, २०२०<br>*मंगळवार, १८ ऑगस्ट, २०२० | मंगळवार, ०८ सप्टेंबर, २०२०<br>मंगळवार, १५ सप्टेंबर, २०२०<br>*मंगळवार, २२ सप्टेंबर, २०२० | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० |
| तीन | १) मुख्यमंत्री<br>२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>३) गृहनिर्माण मंत्री<br>४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | बुधवार, ०५ ऑगस्ट, २०२०<br>बुधवार, १२ ऑगस्ट, २०२०<br>*बुधवार, १९ ऑगस्ट, २०२० | बुधवार, ०९ सप्टेंबर, २०२०<br>बुधवार, १६ सप्टेंबर, २०२०<br>*बुधवार, २३ सप्टेंबर, २०२० | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० |
| चार | १) उप मुख्यमंत्री<br>२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>४) ग्रामविकास मंत्री<br>५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>६) महिला व बालविकास मंत्री<br>७) मृद व जलसंधारण मंत्री | गुरुवार, ०६ ऑगस्ट, २०२०<br>गुरुवार, १३ ऑगस्ट, २०२०<br>*गुरुवार, २० ऑगस्ट, २०२० | गुरुवार, १० सप्टेंबर, २०२०<br>गुरुवार, १७ सप्टेंबर, २०२०<br>*गुरुवार, २४ सप्टेंबर, २०२० | सोमवार, १० ऑगस्ट, २०२०<br>सोमवार, १७ ऑगस्ट, २०२०<br>*सोमवार, २४ ऑगस्ट, २०२० |
| पाच | १) गृह मंत्री<br>२) महसूल मंत्री<br>३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री<br>५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२० | शुक्रवार, ११ सप्टेंबर, २०२०<br>शुक्रवार, १८ सप्टेंबर, २०२०<br>*शुक्रवार, २५ सप्टेंबर, २०२० | मंगळवार, ११ ऑगस्ट, २०२०<br>मंगळवार, १८ ऑगस्ट, २०२०<br>*मंगळवार, २५ ऑगस्ट, २०२० |

***आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२० या कालावधीत वाढ झाल्यास पुर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवड्याच्या प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.**

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : ३ ऑगस्ट, २०२०

**राजेन्द्र भागवत**
सचिव (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रति,**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सर्व अधिकारी
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

**(१) श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे ---- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग
(२) माहिती तंत्रज्ञान विभाग
(३) माहिती व जनसंपर्क विभाग
(४) विधी व न्याय आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय

**(२) श्री. अजित अनंतराव पवार ---- उप मुख्यमंत्री**

वित्त व नियोजन विभाग

**(३) श्री. सुभाष राजाराम देसाई ---- उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री**

(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग व खनिकर्म विषयक बाबी)
(२) मराठी भाषा विभाग

**(४) श्री. अशोक शंकरराव चव्हाण ---- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

**(५) श्री. छगन चंद्रकांत भुजबळ ---- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**(६) श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील ---- कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)
(२) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

**(७) श्री. जयंत राजाराम पाटील ---- जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**

जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग (खार जमिनी विषयक बाबी वगळून)

**(८) श्री. अनिल वसंतराव देशमुख ---- गृह मंत्री**

गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन व बंदरे विषयक बाबी वगळून)

**(९) श्री. विजय *ऊर्फ* बाळासाहेब भाऊसाहेब थोरात ---- महसूल मंत्री**

महसूल व वन विभाग (महसूल विषयक बाबी)

**(१०) डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे ---- अन्न व औषध प्रशासन मंत्री**

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)

**(११) श्री. राजेश अंकुशराव टोपे ---- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

**(१२) श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक ---- अल्पसंख्यांक विकास व औकाफ,कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री**

(१) अल्पसंख्यांक विकास विभाग (अल्पसंख्यांक विकास व वक्फ विषयक बाबी)
(२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

**(१३) श्री. हसन मियालाल मुश्रीफ ---- ग्रामविकास मंत्री**

ग्रामविकास विभाग

**(१४) डॉ. नितिन काशिनाथ राऊत ---- ऊर्जा मंत्री**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)

**(१५) श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड ---- शालेय शिक्षण मंत्री**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (शालेय शिक्षण विषयक बाबी)

**(१६) डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड ---- गृहनिर्माण मंत्री**

गृहनिर्माण विभाग

**(१७) श्री. एकनाथ संभाजी शिंदे ---- नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**

(१) नगर विकास विभाग
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)

**(१८) श्री. सुनिल छत्रपाल केदार ---- पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**

(१) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभाग (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विषयक बाबी)
(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (क्रीडा व युवक कल्याण विषयक बाबी)

**(१९) श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार ---- इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री**

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभाग
(२) जलसंपदा विभाग (खार जमिनी विकास विषयक बाबी)
(३) महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विषयक बाबी)

**(२०) श्री. अमित विलासराव देशमुख ---- वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्ये मंत्री**

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)

**(२१) श्री. उदय रविंद्र सामंत ---- उच्च व तंत्रशिक्षण मंत्री**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**(२२) श्री. दादाजी दगडू भुसे ---- कृषि, माजी सैनिक कल्याण मंत्री**

(१) कृषि व फलोत्पादन विभाग (कृषि विषयक बाबी)
(२) सामान्य प्रशासन विभाग (माजी सैनिक कल्याण विषयक बाबी)

**(२३) श्री. संजय दुलीचंद राठोड ---- वने, भुकंप पुनर्वसन मंत्री**

महसूल व वन विभाग (वने व भुकंप पुनर्वसन विषयक बाबी)

**(२४) श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील ---- पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

**(२५) ॲड. के.सी. पाडवी ---- आदिवासी विकास मंत्री**

आदिवासी विकास विभाग

**(२६) श्री. संदिपानराव आसाराम भुमरे ---- रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री**

(१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(२) कृषि व फलोत्पादन विभाग (फलोत्पादन विषयक बाबी)

**(२७) श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील ---- सहकार, पणन मंत्री**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार, पणन विषयक बाबी)

**(२८) ॲड. अनिल दत्तात्रय परब ---- परिवहन, संसदीय कार्ये मंत्री**

(१) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)
(२) संसदीय कार्य विभाग

**(२९) श्री. अस्लम रमजान अली शेख ---- वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री**

(१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग विषयक बाबी)
(२) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास विभाग (मत्स्यव्यवसाय विषयक बाबी)
(३) गृह विभाग (बंदरे विषयक बाबी)

**(३०) ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे) ---- महिला व बालविकास मंत्री**

महिला व बालविकास विभाग

**(३१) श्री. शंकरराव यशवंतराव गडाख ---- मृद व जलसंधारण मंत्री**

मृद व जलसंधारण विभाग

**(३२) श्री. धनंजय पंडितराव मुंडे ---- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**(३३) श्री. आदित्य उध्दव ठाकरे ---- पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री**

(१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (पर्यटन विषयक बाबी)
(२) पर्यावरण विभाग
(३) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)